Vol 7 Issue 2 Nov 2017
ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University


Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017

# शास्त्रीय संगीत कलाकार निर्माण होण्यामध्ये अनुवांशिकता आणि सांगितिक वातावरणाची भूमिका



सहा. प्रा. उत्तरा रतनसिंग तडवी
जे.डी. पाटील सांगळूदकर महा. दर्यापूर , जि. अमरावती (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :–**

संगीत कलेला ललीत कलांमध्ये विशेष स्थान आहे. मनुष्याच्या अंतर्मनातील भावभावनांना जागृत करण्यासाठी संगीत हे एक सशक्त माध्यम आहे. भारतीय शास्त्रीय संगीत हा भरतीय संगीताचा आधार आहे. शास्त्रीय संगीताच्या साधनेसाठी चिकाटीची आणि सरावाची आवश्यकता असते, त्यामुळे एक तर काही परंपरागत संगीतज्ञ किंवा रसिक लोकच या विद्येचा स्विकार करत आहेत. कुठल्याही संगीतज्ञाचं, कलाकाराचं अथवा संगीत शिकणा–या विद्यार्थ्यांचं एकमेव उद्दीष्ट हे असंतं की या विषयात नैपुण्य मिळवून एक सुप्रसिध्द कलाकार व्हावं परंतु ही कला आत्मसात होण्याकरीता प्रचंड मेहनतीची आवश्यकता असते. जर एखाद्या व्यक्तीचा जन्म सांगीतिक वंशपरंपरेमध्ये होतो तर त्याला संगीतानुकुल वातावरण आपसुकच मिळते आणि अनुवंशाने त्याला जन्मजातच अशा विशेषता मिळतात ज्या त्याला एक सामर्थ्यवान कलाकार बनवितात म्हणूनच शास्त्रीय संगीत कलाकार निर्माण होण्यामध्ये अनुवांशिकता आणि संगीतमय वातावरणाची भूमिका महत्वाची ठरते.

**अभ्यासाचे उद्दीष्टे :–**

1) उच्च प्रतिचा शास्त्रीय संगीत कलाकार होण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याचा अभ्यास करणे.
2) कलाकाराच्या जडणघडणीत अनुवांशिकता आणि वातावरण यांची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :–**

सदरचा संशोधन लेख लिहिण्याकरीता व्दितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. ही व्दितीय माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधन लेख, पुस्तके, मासिके व संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र आणि हेच मानसशास्त्र संगीत विषयाशी संबंधित होऊन संगीताचे मानसशास्त्र झाले, म्हणजे कलाकाराच्या सांगीतिक वर्तनाचा अभ्यास हा संगीताच्या मानसशास्त्रात होऊ लागला. अर्थात सांगीतिक वर्तन हे वेगवेगळे असू शकते. उदा.– एखादा कलाकार गाईल किंवा वादन करेल, एखादा समिक्षक त्या कलेचे विश्लेषण करेल, तो कदाचित गाऊ शकणार नाही, पण कलेचे पदर तो अत्यंत समर्थपणे किंवा समर्पकपणे उलगडून दाखवेल. अध्यापक शिकवण्याचे कार्य उत्तम करेल,रसिक जाणकार असेल, तो आपली प्रतिक्रिया देईल, विद्यार्थी आपले सांगीतिक वर्तन वेगळया प्रकारे दाखवतील. या सर्व वर्तनांचा शास्त्रशुध्द अभ्यास संगीताच्या मानसशास्त्रात येतो. शास्त्राचा आवाका फार मोठा असला तरी इथे मात्र एखादा कलाकार जेव्हां श्रेष्ठ प्रतिचा होतो तेव्हां त्याची क्षमता ही अनुवांशिक आहे की परिस्थितीने तो घडला हे पाहणे अभ्यासीय आहे.

अनुवंश म्हणजे व्यक्तीला नैसर्गिक रित्या मातापित्यांकडून प्राप्त झालेली वा पूर्वीच्या पिढयांकडून प्राप्त झालेली गुणसंपत्ती. आईवडील दोघांकडूनही प्रत्येक 23 गुणसुत्रे घेऊन बाळाचा जन्म होतो. तेव्हांच त्याला हा वारसा मिळतो आणि त्याचे अनुवांशिक गुणधर्म ठरतात. दोघांची गुणसुत्रे समान मिळाली तर मूल दोघांसारखे होते. नाक, कान, डोळे, डोळयांचा रंग, आकार, रूप, बांधा या बरोबरीने अनेक व्याधी, कमतरता या सर्व गोष्टी वारसाहक्काने मिळतात. जेम्स ड्रॉवर यांच्या मतानुसार ''आई वडीलांचे मानसिक व शारिरीक गुण बाळामध्ये हस्तांतरीत होण्यालाच वंशानुक्रम म्हणतात.''

आईकडून आलेल्या 23 गुणसुत्रात आई व तिचे वाडवडील यांचेगुणधर्म घेऊन येणारे जन्यू असतात, तर वडीलांकडून येणा–या 23 गुणसुत्रात वडील व त्यांचे पूर्वज यांचे गुणधर्म घेऊन येणारे जन्यू असतात. काही जन्यू व्यक्तीला मिळतात. ते जर दोघांकडूनही समसमान प्रभावाचे मिळाले व सारखेच असेल तर ते गुणधर्म संक्रमित होतात म्हणूनच आईवडील दोघेही संगीत प्रविण असतील तर त्यांचे बालकही संगीतप्रविण असते.

अनुवांशिकतेनुसार बालकाच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाकरिता मूळ प्रवृत्ती, संवेग, सामान्य जन्मजात प्रवृत्ती, स्नायुसंस्था, ज्ञानेंद्रिये तसेच शारीरिक आणि मानसिक क्षमता व सांगीतिक शक्ती प्राप्त होतात. त्या म्हणजे लय, स्वर, अनुकरण इत्यादी अनुवांशिकता असणा–या व्यक्तींवर या सगळया गोष्टींचा प्रभाव पडतो आणि त्याला संगीत शिकवल्यास तो चांगला कलाकार बनू शकतो.

उस्ताद फैय्याज खॉं आपल्या वडलांकडून ते रंगीले या

प्रसिध्द रचनाकार गवय्याचे पणतू, तर आईकडून आग्रा घराण्याचे संस्थापक गग्गे खुदाबक्ष यांचे पणतू ! म्हणजे रक्तात गाणेच गाणे तालीम मुख्यतः आपले आजोबा उस्ताद गुलाम अब्बास आणि चुलत आजोबा कल्लन खॉ यांच्याकडे झाली. याशिवाय पंडिता गंगूबाई हनगल, श्री सुरेशबाबू माने, पंडिता हिराबाई बडोदेकर, गानतपस्विनी पंडिता किशोरी आमोणकर यांना अनुवांशिकतेचा वारसा लाभला आहे.

अनुवांशिकता म्हणजे जैविक वारसा हा जन्माबरोबरच मिळत असतो, पण परिस्थिती ही बदलणारी गोष्ट आहे. परिस्थिती म्हणजे आजुबाजूचे वातावरण हे वातावरण सांगितिक, आर्थिक, सामाजिक अशा प्रकारचे असते. व्यक्ती ज्या कुटुंबात जन्म घेते त्या कुटुंबाचा आर्थिक व सामाजिक दर्जा, संस्कृती ही ढोबळ मानाने व्यक्तीभोवतीची परिस्थिती आहे. या परिस्थितीजन्य घटकांना व्यक्तीचा सांस्कृतिक, सामाजिक वारसा असे म्हणतात. याचा व्यक्तिविकासावर फार मोठा परिणाम होतो.

प्रसिध्द वैज्ञानिक गिस्बर्ट यांच्या मतानुसार ''वातावरण व्यक्तीत्व निर्माण करण्यास अत्याधिक शक्तीशाली आहे......''

यावरून असे दिसून येते की वातावरणामुळे मानवाच्या मनोविज्ञानात परिवर्तन होते. पूर्वजांपासून मिळालेल्या गुणसुत्रांसून जन्मजात विशेषता मिळतेच परंतु विचारांची पृष्ठभूमी परिस्थितनेच उत्पन्न होते. वातावरणाचे चार कारक प्रमुख आहे.

1) परिवार
2) समाज
3) संगत
4) विद्यालय (शिक्षा)

अनुवंशाने व्यक्तीला जे मूलधन दिलेले असते त्याचा समुचित विकास होणे न होणे हे अर्थातच त्याला मिळणा—या अनुकुल वा प्रतिकुल वातावरणावर अवलंबून असते. प्रस्तुत विषयाच्या संदर्भाच्या दृष्टिने त्यातील काही घटक असे—

1) कलाकाराला चांगल्या गावात राहायला मिळाले की मागास खेडेगावात ?
2) त्याच्या मुलधनाला उर्जित करून शकणारा त्याचाच समानधर्मा असा गुरू त्याला मिळाला का?
3) तो ज्या समाजात वावरतो त्यातील श्रध्दा, मुल्ये, चालीरीती, सांस्कृतिक वैशिष्टये.
4) घरातून प्रोत्साहन मिळाले का ?
5) रियाझाला सोयीचे वातावरण असणे—नसणे, गुरूदक्षिणा देण्याची ऐपत असणे—नसणे, योग्य गुरू मिळणे / न मिळणे व अशा इतर तत्सम बाबींचा वातावरणात, परिस्थितीत अंतर्भाव होतो.

पं. भिमसेन जोशींनी लहानपणी उस्ताद अब्दुल करीम खॉ यांची बसंत रागामधील 'फगवा ब्रिज देखन को चलो री' ही ध्वनिमुद्रीका ऐकली आणि तो आवाज व ती धाटणी (त्यांच्यातील मूलधनामुळे) त्यांच्या मनावर ठसली. असे गाणे आपल्याला कुणी शिकविल का याच्या शोधार्थ ते घरदार सोडून कोलकाता, ग्वाल्हेर या ठिकाणी गेले. त्यांना गायकाचं नाव सुध्दा माहित नव्हतं. फक्त गायन शैलीच त्यांना माहित होती. शेवटी जालंधर येथील हरवल्लभ संगीत सम्मेलनात त्यांना विनायकराव पटवर्धन यांनी सांगितलं की, उस्ताद अब्दुल करीम खॉ यांचे शिष्य सवाई गंधर्व यांच्याकडून संगिताची तालीम घेतली पाहिजे तेव्हां कर्नाटकातच त्यांचे गुरू त्यांना भेटले तेव्हां गुरूसंवेतील कायाकष्टांची पर्वा न करीत त्यांनी आपल्याला हवे असलेले गाणे मिळवले.

पं. जसराज यांनी शाळेला जातांना वाटेतील हॉटेलात बसून बेगम अख्तर यांची 'दिवाना बनाना है तो........' ही रेकॉर्ड अखंडपणे ऐकली (तीच त्यांची शाळा ठरली ) आणि ते 'बाळकडू' त्यांना स्वतःची भावसौंदर्यलक्ष्यी गायकी बनविण्यास उपयोगी पडले.

वातावरणामुळे गायकांच्या आवाजामध्ये त्यांच्या गुरूच्या आवाजाचा प्रभाव काही अंशी श्रव्य गोचर असतो याचे प्रमाण घराणेदार गायक आहेत. प्रत्येक घराण्याच्या शिष्यांचा आवाज तसेच स्वर लगाव, प्रस्तार, घनत्व, ध्वनि विशिष्टता (टोनल क्वालिटी) इत्यादी समान दिसतात. स्वर्गीय उस्ताद अब्दुल करीम खॉ साहेबांच्या शिष्यपरंपरेच्या श्रीमती हिराबाई बडोदेकर,सुश्री सरस्वती राणे, श्री. सुरेश बाबू माने, पं. भिमसेन जोशी आदिंच्या आवाजावर अब्दुल करीम खॉ साहेबांची छाप आहे.

जे गायक वादकांच्या वातावरणाने अधिक प्रभावित आहेत त्यांच्यामध्ये कंठ संगीताच्या विशेषतांची अधिक छाप दिसते. उदाहाणार्थ — उस्ताद विलायत खॉ साहेबांच्या वादन शैलीमध्ये गायकांच्या वातावरणाचा अधिक प्रभाव आहे. त्यामुळे त्यांच्या वादनामध्ये गायकांचे स्वर, लगाव, ध्वनि विशिष्टता आदिंची अधिक छाप आहे. उस्ताद विलायत खॉ साहेबांनी आपल्या वादन शैलीमध्ये गायकी अंगांची प्रबलता येण्याकरीता काही प्रयोग देखील केले आहे. त्यांया मतानुसार — ''मिजराब च्या स्ट्रोक च्या टोनल क्वालिटी ला बदलवून टाकणे म्हणजे सितार वाद्यातील 'दा' च्या प्रहाराऐवजी 'अ' सारखी गाण्याचा आवाज यावा किंवा वाटावा असा माझा प्रयत्न आहे.

यावरून वातावरण एक असे माध्यम आहे ज्यामुळे गायक वा वादक आपल्या गुरूपासून शिक्षा घेऊन आपल्या व्यक्तीगत विलक्षण प्रतिभेने उच कोटीचे संगीतज्ञ, कलाकार होऊ शकतात.

अनुवांशिक कारकांव्दारा व्यक्तीमध्ये संगीताची मूळ प्रवृत्ती, संवेदना, ध्यान, रूची, संवेग, लय इत्यादी घटक येतात. व्यक्तीच्या जीन रचना तिला संगीताची प्रेरणा देत नसेल तर अश व्यक्तीमध्ये संगीतासाठी थोडीही आवड असणार नाही. संगीताची आवड असण्याचे तत्व अनुवांशिकतेशी संबंधित असूनही, त्या लक्षणांच्या अभिव्यक्तीकरिता उपयुक्त अशा पर्यावरणाची गरज असते तयामुळे वेळोवेळी मुलांना शाबासकी देऊन कुटुंबाकडून त्यांना प्रोत्साहनदिले जाते, तेव्हां त्यांचा आत्मविश्वास वाढतो. गुरूंचे योग्य मार्गदर्शन, कठोर शिस्त, श्रवण, कल्पना आणि सर्जनशीलता असे मुलभूत सिध्दांत वातावरणामधूनच कलाकारांमध्ये येतात.

### *निष्कर्ष :—*

माता पित्याकडून जरी मुलांना संगीत प्रतिभेचा वारसा मिळाला, तरी आयुष्यभराची बांधीलकी समजून व त्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करून फक्त संगीतावरच चित्तवृत्ती एकाग्र करण्यासाठी लागणारी प्रेरणा गुरूकडून मिळते. अन्यथा उत्तम प्रकारचा अनुवांशिक वारसा असूनही तो उत्तम प्रतीचा कलाकार होऊ शकत नाही. जन्मजात आवाज व प्रतिभा असणे याला शास्त्रीय भाषेत अनुवांशिकता म्हणता येईल

पण या अनुवांशिकतेच्या बरोबरीने योग्य मार्गदर्शन, पोषक वातावरण आणि सकारात्मक दृष्टीकोन या अत्यंत आवश्यक बाबी असतात यांची जोड मिळाल्यास साधक समर्थ कलाकार बनू शकतो.

***संदर्भग्रंथ सूची :–***

1) संगीताचे मानसशास्त्र – डॉ. प्रेमला काळे – मॅजेस्टिक प्रकाशन–पुणे प्रथमावृत्ती–1989
2) भारतीय संगीत एवं मनोविज्ञान – डॉ. वसुधा कुलकर्णी – राजस्थानी ग्रंथगार, जोधपूर–व्दीतीय आवृत्ती 2013
3) संगीत एवं मनोविज्ञान –डॉ. किरण तिवारी – कनिष्क पब्लीशर्स, नवी दिल्ली–प्रथम आवृत्ती– 2008
4) भारतीय संगीत की परंपरा–डॉ. हरीकिशन गोस्वामी–वंशानुक्रम एवं वातावरण कनिष्क पब्लिशर्स नवी दिल्ली–प्रथम आवृत्ती 2004
5) आस्वादक संगीत समीक्षा–श्रीरंग संगोराम–राजहंस प्रकाशन–पुणे, प्रथम आवृत्ती–2003
6) अंतर्नाद : सुर और साज–पंडित विजयशंकर मिश्र–कनिष्क पब्लिशर्स नवी दिल्ली–प्रथम आवृत्ती–2004
7) भारतीय कंठ संगीत और वाद्य संगीत – डॉ. अरूण मिश्र–कनिष्क पब्लिशर्स नवी दिल्ली–प्रथम आवृत्ती–2002
8) मला भावलेले संगीतकार–डॉ. अशोक रानडे–राजहंस प्रकाशन–प्रथम आवृत्ती–2010
9) संगीत कला विहार–अंक–जून 2010–अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल प्रकाशन.
10) संगीत कला विहार–अंक–जुलै–2010 अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल प्रकाशन.
11) marathivishwakosh.maharashtra.gov.in/

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com